# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. १० मे, २०२१**

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने परिसरातील अनगड व जळाऊ लाकडे जळगाव महानगरपालिकेसोबतच धरणगाव व जामनेर नगरपरिषद, धरणगाव तालुक्यातील पाळधी खुर्द व पाळधी बु. आणि बांभोरी ग्रामपंचायतीलादेखील मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोनामुळे मृत्युत झालेली वाढ पाहून सामाजिक बांधिलकीतून विद्यापीठाने अंत्यविधीसाठी स्ममानभूमीत लाकडे कमी पडू नये म्हणून हा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठ परिसरात अनगड व जळाऊ लाकडे अंदाजे ही १५० ते २०० टन लाकडे आहेत. कोरोनाच्या या उदभवलेल्या सद्यस्थितीत स्मशानभूमीत लाकडे कमी पडू लागली आहेत. त्यामुळे प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांच्या पुढाकाराने विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने विद्यापीठ परिसरातील जळाऊ लाकडे जळगाव महानगरपालिकेकडे मोफत सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार महापालिकेने स्वत:च्या वाहनाने लाकडे उचलण्याची कार्यवाही सुरु केली. दरम्यान धरणगाव व जामनेर नगरपरिषद आणि धरणगाव तालुक्यातील पाळधी खुर्द व पाळधी बु. ग्रामपंचायतीने देखील विद्यापीठाकडे लाकडे देण्याची मागणी केली. विद्यापीठाने या मागणीचा विचार करुन या तिनही ठिकाणी स्मशानभूमीतील दैनंदिन वापरासाठी मोफत लाकडे देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रभारी कुलगुरु प्रा.ई. वायुनंदन यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली. विद्यापीठ बांभोरी ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येते. त्यामुळे बांभोरी ग्रामपंचायतीला देखील लाकडे मोफत देण्याचे विद्यापीठाने ठरविले आहे.

विद्यापीठाच्या ६५० एकरच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यातील कोसळलेली किंवा वाळलेली झाडे एकत्रित करुन ठेवली होती. त्यामध्ये निम, गुलमोहर, सुबाभूळ, निलगिरी तसेच काही काटेरी वृक्षांचा समावेश आहे अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर.भादलीकर यांनी दिली.

---

## संकटाच्या काळात मदत : प्रा.ई.वायुनंदन

**विद्यापीठाच्या परिसरात गेल्या दोन वर्षापासून वाळलेली व कोसळून पडलेल्या झाडांची लाकडे एकत्र करुन ठेवण्यात आली होती. सध्या कोरोनाच्या काळात मृतांची संख्या वाढली असून स्मशानभूमीत लाकडे कमी पडू नयेत यासाठी जळगाव महानगरपालिका, धरणगाव, जामनेर**

**नगरपरिषद आणि पाळधी व बांभोरी ग्रामपंचायतीला लाकडे मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. हे विद्यापीठ संकटाच्या काळात समाजाच्या मदतीला नेहमीच धावून जात असते. तोच पायंडा यावेळी देखील कायम ठेवण्यात आला.**

-------------------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी